# स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई.
(अधिष्ठाता यांचे कार्यालय)

SWAMI RAMANAND TEERTH RURAL GOVT. MEDICAL COLLEGE, AMBAJOGAI DIST BEED

PH NO (02446)245792/248963/249362/248438/-DFAX02446/247132 Website www.srtrmca.org emailsrt.acad@rediffmail.com


जा.क्र. वैमअं/किभांवि/दरपत्रके मागणी/ 5510 /२०२१ दिनांकः- 31 /०५ /२०२१

**कार्यालयीन आदेश**

विषय :- वाटर कुलर,वाटर फिल्टर दुरुस्ती करीता लागणाऱ्या साहित्यांचे दरपत्रक सादर करणे बाबत...
संदर्भ :-१.दि.०५.०५.२०२१ रोजीची खरेदी समितीची बैठक.
२.दि.२४.०५.२०२१ रोजीची मंजुर टिपणी.

उपरोक्त विषयी संदर्भ क्र. १ व २ अन्वये आपणास कळविण्यात येते की, या महाविद्यालयातील विविध विषयांचे विभाग, ग्रंथालय विभाग, प्रशासकीय कार्यालय व वैद्यकीय विद्यार्थी वस्तीगृहत बसविण्यात आलेल्या वाटर कुलर,वाटर फिल्टर दुरुस्ती करीता लागणाऱ्या साहित्यांचे दरपत्रक खालील प्रमाणे सोबत जोडलेल्या यादीनुसार सादर करण्यात यावे.

तसेच सदर सुचनेनुसार मोहरबंद दरपत्रके मा.अधिष्ठाता,स्वामी रामानंद तिर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई यांच्या नावे सादर करण्यात यावी.तसेच सदरील साहित्यांचे दरपत्रक सादर करण्यासाठी अंतिम दिनांक 08 /06/ २०२१ रोजी दुपारी ०५:०० वा. पर्यंत असून प्राप्त झालेली दरपत्रके दिनांक 09 /06 /२०२१ रोजी प्रशासकीय कार्यालयात खरेदी समिती समक्ष उघडण्यात येतील. तसेच दरपत्रकधारकास दरपत्रके उघडण्याकरीता उपस्थित राहवयाचे असल्यास या कार्यालयाची काही हरकत नाही.

| अ.क्र. | साहित्यांचे नाव | नग संख्या | प्रत्येकी दर |
|---|---|---|---|
| ... | सोबत अ.क्र.०१ ते अ.क्र.१८ पर्यंतची यादी जोडण्यात आलेली आहे. | एकुण १८ नग | ... |

अटी व शर्ती :-

१. दरपत्रक धारकाने मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियम १९४८ नुसार दुकानाचे शासन मान्य नोंदणी प्रमाणपत्र किंवा सुक्ष्म,लघु व मध्यम उद्यम मंत्रालय भारत सरकार यांच्याकडे नोंदणी केलेले उद्योग आधार प्रमाणपत्र छायांकीत प्रत दरपत्रका सोबत जोडणे बंधनकारक आहे.

२. दरपत्रक धारकाच्या दुकानाचे नाव, संपुर्ण पत्ता, नोंदणी क्रमांक,जिएसटी नंबर व पॅन नंबर असलेल्या दुकानाच्या लेटर पॅडवर सहि व शिक्का असलेली दरपत्रके सदर साहित्याच्या अ.क्र. यादीनुसार सादर करण्यात यावी. तसेच ज्या साहित्यांचे दर उपलब्ध होऊ शकत नाहित त्या साहित्यांच्या दराच्या ठिकाणी एन.ए. (**NA**) असे नमुद करावे.

३. दरपत्रका सोबत शासन मान्य जिएसटी प्रमाणपत्र, फर्मच्या नावाचे किंवा प्रोप्रायटरच्या नावाचे पॅन कार्डची छायांकीत प्रत तसेच एकल दरपत्रक धारक असल्याचे स्वतः स्वाक्षरीचे प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक आहे. (सदर प्रमाणपत्र नमुना देण्यात आलेला आहे.) तसेच मागील एक वर्षाचे आयकर (ITR) भरणा प्रमाणपत्र सादर करावे.

४. दरपत्रकातील साहित्यांचे दर शासन नियमानुसार सर्व करांसहित बाजार भावापेक्षा जास्त दराचे सादर करण्यात येऊ नये.तसेच सर्व साहित्य स्वतः स्वखर्चाने दहा दिवसांच्या आत पुरवठा करणे बंधनकारक राहिल. तसेच वाहतुक खर्च किंवा इतर कोणताही जादा खर्च देण्यात येणार नाही. तसेच सर्व साहित्यांच्या दरावर जीएसटी समाविष्ठ आहे किंवा नाही या बाबत नमुद करावे.

५. मागविण्यात आलेल्या साहित्यांचे दरपत्रक प्रमाणित झाल्याच्या दिनांका पासुन सहा (०६) महिण्यांपर्यंत वैध राहतील.

६. प्रशासकीय कारणास्तव देयके अदा करण्यास विलंब झाल्यास विलंब शुल्क किंवा व्याज देण्यात येणार नाही.

७. पुरवठा करण्यात येणारे साहित्य वैध कालावधीचे व चांगल्या प्रतीचे असावे. हलके किंवा निकृष्ठ दर्जाचे असल्यास पुरवठा आदेश रद्द करण्यात येतील व याची सर्वस्वी जबाबदारी आपणावर राहिल.

८. तसेच अपुर्ण माहितीसह व प्रमाणपत्रा शिवाय सादर केलेली संबंधीतांची दरपत्रके विना स्पष्टीकरन नाकारण्यात येतील तसेच प्रशासकीय कारणास्तव किंवा निधी अभावी काही अडचण निर्माण झाल्यास साहित्य खरेदी बाबत सदरच्या दरपत्रकाची संपुर्ण प्रक्रिया रद्द करण्याचा अधिकार अधिष्ठाता यांना राहील.

१०.उपरोक्त प्रमाणे अटी व शर्ती मान्य असल्यासच सदरचे दरपत्रक सादर करावे.

31.5.21

**Incharge Store**
Petty Supply
S.R.T.R.G.M.C. Ambajogai

अधिष्ठाता
स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय
वैद्यकिय महाविद्यालय,अंबाजोगाई.

प्रतः- १.संस्थेची वेबसाईट ,स्वा.रा.ती.ग्रा.शा.वै.म. अंबाजोगाई.
२.नोटीस बोर्ड महाविद्यालय विभाग,स्वा.रा.ती.ग्रा.शा.वै.म. अंबाजोगाई.

01.06.21
11.03am

जा.क्र. ५५१०/दि.३१.०५.२०२१

स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई या संस्थेकरीता वाटर कुलर,वाटर फिल्टर दुरुस्ती करीता लागणाऱ्या साहित्यांचे दरपत्रक सादर करण्यात यावे.

| Sr.no. | Name of the Item | Qunt. | Rate |
|---|---|---|---|
| ०१ | Water Filter Memorin | 01 nos. | .. |
| ०२ | Water Filter FRT -800 | 01 nos. | .. |
| ०३ | Water Filter Sonlet Wall 24 Wat | 01 nos. | .. |
| ०४ | Water Filter Sonlet Wall 36 Wat | 01 nos. | .. |
| ०५ | Free Filter -20" (inch) | 01 nos. | .. |
| ०६ | CTO Filter -20" (inch) | 01 nos. | .. |
| ०७ | GSE - 20" (inch) | 01 nos. | .. |
| ०८ | Water Filter Pump | 01 nos. | .. |
| ०९ | SMPS Powor Supply | 01 nos. | .. |
| १० | Pip 3/8 | 01 nos. | .. |
| ११ | LBW 1/4, 3/8 | 01 nos. | .. |
| १२ | Swdimet Filter-10" (inch) | 01 nos. | .. |
| १३ | Carban Filter -10" (inch) | 01 nos. | .. |
| १४ | Ultra Vailet | 01 nos. | .. |
| १५ | Water Cooler Comprresar | 01 nos. | .. |
| १६ | Water Cooler RELEE | 01 nos. | .. |
| १७ | Water Cooler Coopur Pip | 01 nos. | .. |
| १८ | Water Cooler Thramos Start | 01 nos. | .. |

नोट :- १.उपरोक्त प्रमाणे सर्व साहित्य चांगल्या प्रतीचे टिकाऊ तसेच बाजारभावा प्रमाणे रास्त असणे आवश्यक आहे. तसेच सदर दरपत्रक मागणी आदेशातील अटीव शर्ती नुसार सदर दरपत्रका सोबत मागणी करण्यात आलेले आपल्या फर्मचे सर्व प्रमाणपत्र जोडण्यात यावे अन्यथा दरपत्रके रद्द करण्यात येतील.तसेच रद्द केलेल्या संबंधीत दरपत्रकाबाबत लेखी कळविण्यात येणार नाही याची नोंद घेण्यात यावी.

२.पुरवठा आदेशानुसार पुरवठा करण्यात येणारे साहित्य संबंधीत उपभोक्ता विभागास मोफत (विना शुल्क) व्यवस्थितरित्या अत्यंत तात्काळ बसवुन / सुरु करुन (प्रस्थापीत करुन) देण्यात यावे.तसेच वाटर कुलर व वाटर फिल्टर यांच्या दैनंदिन वापरात किरकोळ साधारण दुरुस्ती (कोणत्याही नविन साहित्याचा वापर न करता) असल्यास अत्यंत तात्काळ मोफत (विना शुल्क) करुन देण्यात यावी.याकरीता कसल्याहि प्रकारचे सर्विस चार्ज (देयक) अदा करण्यात येणार नाही.

31.5.21

Incharge Store
Petty Supply
S.R.T.R.G.M.C. Ambajogai

अधिष्ठाता
स्वा.रा.ती.ग्रा.शा.वै.म. अंबाजोगाई

जा.क्र. 5510 / दि. 31.05.2021

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, आपल्या कार्यालयाच्या दरपत्रक मागणी आदेशानुसार मागविण्यात आलेल्या साहित्यांच्या दरपत्रकात माझे स्वतःचे एकच दरपत्रक असुन आपणास प्राप्त झालेल्या दरपत्रकात माझे दुसरे दरपत्रक सादर करण्यात आलेले नाही. तसेच आपल्या कार्यालया बरोबर माझे कोणतेही हित संबंधनाहीत याबाबत पुढील काळात आपल्या कार्यालयाच्या निदर्शनास आल्यास माझ्यावर होणाऱ्या दंडात्मक कार्यवाहीस मी स्वतः जबाबदार राहील. करीता सदर प्रमाणपत्र सादर करण्यात येत आहे.

दरपत्रक धारकाचीस्वाक्षरी व शिक्का

दिनांक :-

ठिकाण :-

नाव :-

पत्ता :-

मो.नं. :-